NAAC Accredited-2015
B Grade (CGPA 2.62)

# सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
# कौशल्य विकास केंद्र

## पात्रतेचे निकष व नियम

१. प्रवेशित विद्यार्थ्यांच्या पात्रतेचे निकष हे प्रवेशित असलेल्या अभ्यासक्रमानूसार राहतील. या निकषांचे उल्लंघन झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित महाविद्यालय/संस्थेची राहील.

२. प्रवेशित विद्यार्थ्यांची पात्रता तपासून घेणे सर्व महाविद्यालय/संस्थांवर बंधनकारक राहील. प्रवेशित विद्यार्थ्यांची पात्रता प्रवेश घेतल्यानंतर ३ महिन्याच्या आत सादर करणे आवश्यक राहील.

३. (YCMOU, S.S.C., H.S.C., N.I.O.S., Other State, ) इत्यादी विद्यार्थ्यांना देखील कौशल्य विकास केंद्राच्या अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेता येईल.

४. प्रवेशित विद्यार्थ्यांची माहिती, विद्यापीठाच्या आवश्यकतेनुसार पुरवणे संबंधीत महाविद्यालय/संस्थाना बंधनकारक राहील.

५. कौशल्य विकास अभ्यासकेंद्रांशी निगडित अभ्यासक्रमास विद्यार्थ्यांने प्रवेशित झाल्यानंतर प्रवेशित विद्यार्थ्यांस आपला प्रवेश रद्द करता येणार नाही. करावयाचा असल्यास अशा विद्यार्थ्यास विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नियमानुसार शुल्क बाबत कार्यवाही केली जाईल.

६. प्रवेशित विद्यार्थी परीक्षेत अनुत्तीर्ण झाल्यास पुढील परीक्षेवेळी त्याचे पूर्ण प्रशिक्षण/अभ्यासक्रम शुल्क न भरता केवळ परीक्षा शुल्क व गुणपत्रक शुल्क भरून परीक्षा देता येईल.